MHAH070001202026

**मोटार वाहन अपघात किरकोळ अर्ज क्र.१९/२०२६ मधील**

**निशाणी १ वरील आदेश**

(निलोफर नसीर सयद वि. कोणीही नाही)

अर्जदार क्र.१ निलोफर नसीर सय्यद हिने तिची अ.पा.क मुलगी अर्जदार क्र.३ आयशा नसीर सयद हिला तिच्या वडीलांच्या अपघाती मृत्यूबाबत मिळालेल्या नुकसानभरपाईच्या रक्कमेतील रक्कम रूपये १,१०,५००/— इतक्या मुदत ठेव (Fixed Deposit) रक्कमचे मुदत पूर्व पैसे काढण्यास परवानगी देण्याबाबत अर्ज सादर केला आहे.

२. दिनांक १६/०७/२०१३ रोजीच्या मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र.७१/२०११ मधील न्यायनिर्णयानुसार अर्जदारास एकूण नुकसान भरपाईच्या रक्कमेपैकी अर्जदार क्र.१ ला ५० टक्के व अर्जदार क्र.२ ते ६ यांना १०:१० हिस्सा मंजूर करण्यात आला होता. त्या रक्कमपैकी रूपये १,१०,५००/— इतकी रक्कम अर्जदार क्र.३ सज्ञान होईपावेतो मुदत ठेव म्हणून ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार बॅक ऑफ बडोदा मध्ये (एफ.डी. पावती क्र.०५१०८०, कालावधी ०१/०१/२०१४ ते ०१/०१/२०२४) अशी मुदत ठेव करण्यात आलेली आहे.

३. अर्जदार क्र.१ च्या कथनाप्रमाणे अर्जदार क्र.३ ही शिक्षण घेत असुन तिच्या शिक्षणाकरीता पैशांची अत्यंत तातडीची गरज आहे. अर्जदार क्र.३ हिस सदर रक्कम तातडीने शैक्षणीक खर्चाकरीता आवश्यक असल्याने तिचा अर्ज नाकारण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. अर्जदार क्र.३ चे वय १७ वर्षे असून तिला पैशांची तातडीची आवश्यकता असल्याचे प्रतिज्ञापत्र अ.पा.क. म्हणुन अर्जदार क्र.१ ने सादर केले आहे. तसेच अधिक्षक, जिल्हा न्यायालय, संगमनेर यांच्या दि. २३/०२/२०२६ च्या अहवालानुसार अर्जदार क्र.२, ३ व ६ करीता दि. ०५/१२/२०१३ रोजी डी.रजि.क्र.२११ नुसार रक्कम रुपये ३,३१,५६३/— मुदतठेवीत ठेवण्यासाठी पाठविण्यात आल्याचे दिसुन येते. सबब वरील सर्व

कारणाकरीता अर्जदार क्र.१ हिस अर्जदार क्र.३ च्या नावे असलेल्या बँक ऑफ बडोदा मधील मुदत ठेव पावती क्र.०५१०८०, रक्कम रूपये १,१०,५००/— च्या मुदत पूर्व रक्कम काढण्यास परवानगी देणे योग्य व न्याय्य वाटते, म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येतो.

**<u>आदेश.</u>**

१. अर्जदार क्र.१ निलोफर नसीर सय्यद यांना अर्जदार क्र.३ आयशा नसीर सय्यद हिच्या नावावर बँक ऑफ बडोदा येथे असलेल्या रक्कम रूपये १,१०,५००/— ची मुदत ठेव मुदत पूर्व काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. बँकेचे व्यवस्थापक यांनी आवश्यक तपशीलांची पडताळणी करून नियमानुसार अर्जदार क्र.१ निलोफर नसीर सय्यद यांना अर्जदार क्र.३ आयशा नसीर सय्यद हिच्या नावे सदर मुदत ठेव रक्कम अदा करावी.

३. रक्कम अदा करण्यापूर्वी खालील मुदत ठेव पावतीचे तपशील पडताळाव्यात:

**<u>मुदत ठेव धारकाचे नाव:</u>** आयशा नसीर सय्यद.(अ.पा.क.निलोफर नसीर सयद)

**<u>बँकेचे नाव :</u>** बँक ऑफ बडोदा (मुदत ठेव पावती क्र.०५१०८०, कालावधी ०१/०१/२०१४ ते ०१/०१/२०२४)

**<u>मुदत ठेव रकम :</u>** रूपये १,१०,५००/—

४. सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सही/—

**(विवेक बी. गव्हाणे)**
जिल्हा न्यायाधीश—३,
संगमनेर.

दिनांक : ०९/०३/२०२६
ठिकाण : संगमनेर.